ePaper **लोकसभेवर निवडून येऊनही नारायण राणे यांना डच्चू!**



║वर्ष - 7 ।अंक - 340║ UDYAM-MH-26-0158827║

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


**आतील पानांत**

- मोदींचं पंतप्रधान झाल्याबद्दल अभिनंदन!
- 'भैय्याजी' आहे तरी कोण?
- केजरीवालांच्या जामीन अर्जाला विरोध
- पतसंस्थेत नेमकं चाललंय काय ?


www.mahaenews.com | सोमवार , दिनांक 10 जून 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात भव्य शपथविधी सोहळा

# मैं नरेंद्र दामोदरदास मोदी!

### नरेंद्र मोदी यांच्यासह 64 जणांना शपथ; राज्यातील 3 नव्या चेहऱ्यांसह 6 जणांना मंत्रिपदे

।नवी दिल्ली ।महाईन्यूज

**नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी (रालोआ) सरकारचा शपथविधी सोहळा रविवारी सायंकाळी झाला. पंतप्रधानांसह ३० कॅबिनेट, पाच स्वतंत्र कारभार असलेले राज्यमंत्री व ३६ राज्यमंत्र्यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. राज्यातील सहा जणांना पहिल्या मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले असून यात तीन नवे चेहरे आहेत. या शपथविधीने वाजपेयी सरकारनंतर पुन्हा एकदा रालोआचा कालखंड सुरू झाला आहे. अलीकडेच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत भाजप २४० जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला असून रालोआने २९३ जागा जिंकल्यानंतर मोदी यांची नेतेपदी एकमताने निवड करण्यात आली होती. त्यानंतर रविवारी तिसऱ्या मोदी सरकारचा शपथविधी झाला.**





यावेळी राजनाथ सिंह, अमित शहा, नितीन गडकरी, निर्मला सीतारमण, एस. जयशंकर या जुन्या चेहऱ्यांसह भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा, मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान, हरियाणाचे माजी मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर या वरिष्ठ नेत्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. शपथ देण्यात आलेल्या ३० कॅबिनेट मंत्र्यांपैकी १९ जणांना पुन्हा संधी देण्यात आली आहे, तर ११ नवीन चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. यामध्ये भाजपच्या मंत्र्यांचा बोलबाला आहे. घटक पक्षांपैकी जेडीएसचे एच डी कुमारस्वामी, जेडीयूचे राजीव रंजन, टीडीपीचे के राम मोहन नायडू, लोक जनशक्ती पक्षाचे (रामविलास पासवान गट) चिराग पासवान आणि हिंदुस्तान अवामी मोर्चाचे जितनराम मांझी यांना कॅबिनेट मंत्रीपदाची शपथ देण्यात आली.

कुमारस्वामी, शिवराजसिंह चौहान, खट्टर, सर्बानंद सोनोवाल, मांझी आणि राजनाथ सिंह या सहा माजी मुख्यमंत्र्यांनी केंद्र सरकारमध्ये नवी भूमिका स्वीकाली आहे. तर मागच्या मंत्रिमंडळातील नारायण राणे, स्मृती इराणी, अनुराग ठाकूर आणि राजीव चंद्रशेखर या महत्त्वाच्या मंत्र्यांना वगळण्यात आले आहे. नव्या मंत्रिमंडळात २७ ओबीसी, १० दलित, ५ आदिवासी, ५ अल्पसंख्याक नेत्यांचा समावेश आहे. अश्विनी वैष्णव, हरदीपसिंह पुरी, जयशंकर, कुरियन, सीतारामन हे राज्यसभेतील खासदार मंत्री असून पंजाबमधील रवनीतसिंह बिट्टू आणि तमिळनाडूतील एम. मुरुगन यांना लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतरही केंद्र सरकारमध्ये स्थान देण्यात आले आहे.

मंत्रिमंडळाच्या साथीने १४० कोटी भारतीयांची सेवा करून देशाला नव्या उंचीवर न्यायचे आहे. हे मंत्रिमंडळ म्हणजे अनुभवी आणि तरुणांचे उत्तम मिश्रण आहे.

## शिंदे गटाला केवळ राज्यमंत्रिपद

लोकसभा निवडणुकीत बहुमत मिळवल्यानंतर भाजपाप्रणित एनडीएने सत्तास्थापन केली आहे. एनडीएचे प्रमुख नरेंद्र मोदी यांनी आज तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. तसेच मोदींच्या तिसऱ्या मंत्रिमंडळातील ६३ मंत्र्यांनी आज (१० जून) मंत्रिपदाची शपथ घेतली. यामध्ये कॅबिनेट आणि राज्यमंत्र्यांचाही समावेश आहे. २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला स्पष्ट बहुमत मिळालं होतं. त्यामुळे भाजपाला सत्तास्थापनेसाठी इतर पक्षांवर अवलंबून राहावं लागलं नव्हतं. तेव्हा भाजपाने इतर पक्षांना मोठी मंत्रिपदं दिली नव्हती. तसेच मंत्रिमंडळात इतर पक्षांमधील केवळ तीन ते चारच चेहरे होते. मात्र यावेळी भाजपाला केवळ २४५ जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे सत्तास्थापनेसाठी भाजपा चंद्राबाबू नायडू यांचा तेलुगू देशम पार्टी, नितीश कुमार यांचा संयुक्त जनता दल आणि एनडीएतील इतर पक्षांवर अवलंबून आहे. त्यामुळे यावेळी सत्तेत वाटेकरी वाढले आहेत. भाजपाने अनेक मित्रपक्षांच्या नेत्यांना कॅबिनेट मंत्रिपदं दिली आहेत. मात्र महाराष्ट्रातील मित्रपक्षांवर अन्याय केल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

# विधानसभा निवडणूक धोक्याची!

## फडणवीसांना कळून चुकलंय फक्त आता मविआची एकी गरजेची : अमोल कोल्हे

। हडपसर (पुणे)।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘महाविकास आघाडीने राज्यात १५० पेक्षा जास्त ठिकाणी मताधिक्य मिळवले आहे. त्यामुळे विधानसभा निवडणूक धोक्याची आहे, हे समजल्यानंतर भाजपचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा देण्याचे ठरवले आहे. विधानसभा निवडणुकीत आपल्याला २००च्या पुढे जाण्यासाठी महाविकास आघाडी एकसंघ राहिली पाहिजे,’ असे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी सांगितले.**





शिरूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे नवनिर्वाचित खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या सत्काराचा कार्यक्रम ससाणेनगर येथे झाला. माजी नगरसेवक योगेश ससाने यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्या वेळी डॉ. कोल्हे बोलत होते. या वेळी माजी मंत्री बाळासाहेब शिवरकर, माजी आमदार महादेव बाबर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, माजी उपमहापौर नीलेश मगर, प्रवीण तुपे, पुणे शहर शिवसेना शहराध्यक्ष संजय मोरे, राजेंद्र बाबर आदी उपस्थित होते.

शिवरकर म्हणाले, ‘महाविकास आघाडीच्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी काम केल्याने अमोल कोल्हे यांना मताधिक्य मिळाले आहे.’ योगेश ससाने म्हणाले, ‘खासदार कोल्हे यांनी हडपसरमधील नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी वेळ द्यावा. महापालिका आयुक्तांशी समन्वय साधल्याने नागरिकांचे प्रश्न सुटतील.’

### अमोल कोल्हे शिरूरमधून दुसऱ्यांदा विजयी

शिरूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे यांनी दुसऱ्यांदा विजय साकारत महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांचा पराभव केला आहे. डॉ. कोल्हे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून निवडणूक लढवली होती, तर आढळराव पाटील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून निवडणुकीच्या रिंगणात होते. डॉ. कोल्हे यांच्या विजयामुळे तुतारीचा आवाज पुढील पाच वर्षे शिरूर मतदारसंघात घुमणार आहे.

### राजीनाम्याचा निर्णय बदलला...

लोकसभेच्या निवडणुकीत राज्यात भाजपची असमाधानकारक कामगिरी झाल्याची जबाबदारी स्वीकारून राजीनामा देण्याची तयारी दर्शविणारे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपला निर्णय बदलला असून यापुढेही लढत राहणार असल्याचे संकेत दिले. राज्यात महाविकास आघाडीतील तीन पक्षांसमवेतच नव्हे तर ‘खोटा प्रचार’ या चौथ्या विरोधी पक्षाशीही महायुतीला निवडणुकीत लढावे लागले, असे फडणवीस म्हणाले. निवडणूक निकालानंतर पक्षाने आयोजित केलेल्या बैठकीत ते बोलत होते. देवेंद्र फडणवीस यांच्यावर आमचा विश्वास आहे आणि तेच आमचे नेते असतील, असा ठराव भाजपच्या आमदारांनी या बैठकीत केला. त्यावेळी फडणवीस यांनी चौथ्या विरोधी पक्षाबाबत भाष्य केले.

निवडणुकीत भाजपला जोरदार फटका बसला त्यामुळे उद्विग्न होऊन अथवा भावनेच्या आहारी जाऊन आपण राजीनामा देण्याची तयारी दर्शविली नव्हती, आपण पळपुटे नाही, लढत राहणारे आहोत, चारही बाजूंनी घेरले तरी पूर्ण ताकदीनिशी पुन्हा उभारी घेऊ शकतो आणि हेच आपण छत्रपती शिवाजी महाराजांकडून शिकलो, असेही फडणवीस म्हणाले. दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली, त्यांनीही आपल्याला काम करीत राहण्यास सांगितले आणि त्याप्रमाणे आपण काम करीत राहणार आहोत, विधानसभेच्या निवडणुकीसाठीची तयारी सुरू केली आहे. भाजपची घटना बदलण्याची इच्छा आहे, अशी अफवा पसरविण्यात आली त्यामुळे महायुती दुखावली गेली. चौथ्या विरोधी पक्षाची जाणीव आपल्याला चौथ्या टप्प्यातील मतदान संपल्यानंतर झाली, असेही फडणवीस म्हणाले.

शिवसेनेला (उबाठा) सहानुभूती मिळाल्याची चर्चा होती, मात्र त्यांच्या पक्षाला ठाणे आणि कोकणात फटका बसला, तेथे शिवसेनेला (उबाठा) एकही जागा मिळाली नाही. मुंबईत मराठी भाषकांनी उद्धव ठाकरे यांना पाठिंबा दिला नाही, विशिष्ट समाजाच्या एकत्रित मतांचा त्यांना लाभ झाला. वरळी, शिवडी, विक्रोळी आणि भांडुप या मराठीबहुल विधानसभा क्षेत्रात त्यांना कमी मताधिक्य मिळाले, असेही उपमुख्यमंत्री म्हणाले.

# भाजपवरील श्रद्धा अन् सबुरीचे फळ!

## पहिल्यांदाच खासदार झालेल्या मोहोळ यांच्या गळ्यात मंत्रिपदाची माळ

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बूथ आणि वॉर्ड स्तरावर काम करणारा भारतीय जनता पक्षाचा निष्ठावंत कार्यकर्ता, नगरसेवक, स्थायी समिती अध्यक्ष, महापौर आणि खासदार असा मुरलीधर मोहोळ (वय ४९) यांचा राजकीय प्रवास राहिला आहे. यंदा प्रथमच खासदारकीची माळ गळ्यात पडल्यानंतर त्यांनी थेट केंद्रीय मंत्रिपदाला गवसणी घातली आहे. गणपतीबरोबरच साईबाबांचे भक्त असलेल्या मोहोळ यांना अखेर पक्षावरील श्रद्धा आणि सबुरीचे फळ मिळाले आहे.**



मुळशी तालुक्यातील मुठा हे मोहोळ यांचे मूळ गाव. तेथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत त्यांनी धडे गिरवले. वडील किसनराव नोकरीसाठी पुण्यात आल्यानंतर मोहोळ भावे हायस्कूलमध्ये दाखल झाले. मोहोळ यांचे वडील बँकेत शिपाई होते. आजोबा दगडोबा, वडील, चुलते रामचंद्र, मोठा भाऊ प्रभाकर हे पैलवान असल्याने हीच परंपरा जपत मुरलीधर यांनी कुस्तीच्या सरावासाठी कोल्हापूर गाठले. तेथूनच कला शाखेची पदवी घेतली. आंतरविद्यापीठ आणि राष्ट्रीय स्तरावराच्या आखाड्यापर्यंतच्या कुस्ती स्पर्धा त्यांनी गाजवल्या. पायाच्या दुखापतीमुळे त्यांना कुस्ती थांबवावी लागली.

पुणे लोकसभा मतदार संघातून पहिल्यांदाच खासदार म्हणून निवडून आलेले मुरलीधर मोहोळ यांच्या गळ्यात केंद्रीय राज्यमंत्रीपदाची माळ पडली आहे. रविवारी सायंकाळी दिल्लीत राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात मुरलीधर मोहोळ यांनी शपथ घेताच शहर भाजपने एकच जल्लोष केला. मुरलीधर मोहोळ यांना केंद्रात मंत्रीपद मिळणार असल्याची बातमी रविवारी सकाळी पुणेकरांना मिळाली. त्यानंतर दिवसभर भाजप कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी या शपथविधी सोहळा पाहण्यासाठी जोरदार तयारी केली होती. तर, एसपी महाविद्यालय चौक तसेच मोहोळ यांच्या कोथरूड येथील संपर्क कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी “काय म्हणता पुणेकर, मंत्री झाले मुरलीधर’ अशा घोषणा देत जल्लोष साजरा केला.

### सार्वजनिक मंडळांतून समाजकार्य

कोथरूडमधील श्री साई मित्र मंडळाच्या माध्यमातून मोहोळ यांनी सामाजिक कार्याचा श्रीगणेशा केला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत ते जाऊ लागले आणि १९९३च्या सुमारास भाजपशी जोडले गेले. अनिल शिरोळे यांच्या माध्यमातून दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांचे कट्टर समर्थक अशी त्यांची ओळख बनली. सन २००२ मध्ये महापालिकेच्या निवडणुकीसाठी दावेदारी नाकारल्यानंतर पक्षाने त्यांना शिक्षण मंडळाचे सदस्य केले. काँग्रेसचे सुबराव कदम यांच्या निधनानंतरच्या पोटनिवडणुकीत विजयी होऊन सन २००६ मध्ये मोहोळ प्रथमच नगरसेवक झाले. त्यानंतर सन २००७ मध्ये ते पुन्हा नगरसेवक झाले.

## भाजपाच्या माजी नगरसेविका प्रियांका बारसे यांचा राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश!

# पिंपरी-चिंचवडमध्ये महायुतीला पहिला धक्का!

### महाविकास आघाडीकडून भोसरीतून निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता?

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भोसरीतील भाजपाच्या नगरसेविका प्रियांका प्रविण बारसे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत आज यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात अधिकृत प्रवेश केला. लोकसभा निवडणुकीनंतर पिंपरी-चिंचवडमध्ये महायुतीला हा पहिला धक्का मानला जात आहे. विशेष म्हणजे, आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीकडून बारसे निवडणुकीच्या रिंगणात उतरतील? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.**



यावेळी खासदार सुप्रिया सुळे, माजी मंत्री आमदर जितेंद्र आव्हाड, युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, युवक शहराध्यक्ष इम्रान शेख कार्याध्यक्ष सागर तापकीर यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश घेण्यात आला. यावेळी रजनीकांत गायकवाड, शाहिद शेख,अशरफ शेख,फहिम शेख, मेघराज लोखंडे, समाधान अचलखांब, प्रवीण बारसे तसेच सुहास देशमुख, प्रथमेश बारसे, कान्होपात्रा थोरात, वैशाली पडवळ आधी युवक आणि महिला पदाधिकारी उपस्थित होते.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने महाराष्ट्रात बाजी मारली.या निवडणुकीत शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने दहा पैकी आठ खासदार निवडून आणत महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनता शरदचंद्र पवार यांच्या पाठीशी असल्याचे दाखवून दिले. तसेच शिरूर लोकसभेत डॉ अमोल कोल्हे यांना मिळालेल्या जनसामान्याचे कौल लक्षात घेत पिंपरी चिंचवड शहरातील लोकप्रतिनिधी यांचा कल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाच्या दिशेने जाण्याचे संकेत आता मिळू लागले आहे.

> “भाजपाच्या स्थानिक नेतृत्त्वाच्या हुकूमशाही कार्यपद्धतीला कंटाळून तसेच आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या विचाराला प्रेरित होऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहे. भाजपमधील अजून सहकारी आमच्या सोबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात येण्यास तयार आहेत. येणाऱ्या काळात प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील साहेब खासदार डॉ अमोल कोल्हे साहेब यांच्या नेतृत्वात तसेच युवकअध्यक्ष इम्रान शेख आणि सहकारी यांच्या सोबतीने पिंपरी चिंचवड शहरात जोमाने काम करणार आहे.
>
> – प्रियांका बारसे, माजी नगरसेविका.

भोसरीतील शिक्षण संस्थेच्या माध्यमातून सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या उच्चशिक्षित भाजप नगरसेविका प्रियांका बारसे यांच्या राष्ट्रवादीतील प्रवेशामुळे पिंपरी चिंचवड शहरात तुतारी जोरात वाजणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

#### बारसे तो झाँकी है, पाच और बाकी है... : इम्रान शेख

“आज मुंबई येथे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आणि भाजपच्या भ्रष्टाचाराला कंटाळून भाजपच्या नगरसेविका प्रियांका बारसे यांनी आमच्या पक्षात प्रवेश केला.आदरणीय शरदचंद्र पवार साहेब यांच्या शिव फुले शाहू आंबेडकर विचारधारेला प्रभावीत होऊन प्रियांका बारसे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अधिकृत प्रवेश केला असून लोकसभा निकालाच्या आधी पासून त्या जयंत पाटील साहेब यांच्या संपर्कात होत्या. येत्या काही दिवसात इतर पक्षातील पाच नगरसेवक प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील साहेब यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करतील, असा दावा युवक शहराध्यक्ष इम्रान शेख यांनी केला आहे.

---

## शेवटच्या घटकांतील नागरिकांच्या अपेक्षांची पूर्तता हाच संकल्प!

### आ. महेश लांडगे यांची भावना, कृष्णानगर येथील मंदिरांच्या प्रस्तावित कामांचे भूमिपूजन

। पिंपरी।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी विधानसभा मतदार संघासह पिंपरी-चिंचवडमधील शेवटच्या घटकांतील नागरिकांच्या अपेक्षांची पूर्तता करणे आणि विकसित शहर घडवण्याचा संकल्प आम्ही केला आहे, अशी भावना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केली.**




भोसरी विधानसभा मतदार संघातील कृष्णानगर येथे रायरेश्वर प्रतिष्ठाणच्या माध्यमातून श्री. रायरेश्वर मंदिरासाठी सभा मंडपाच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी आमदार लांडगे बोलत होते. यावेळी कृष्णानगर येथील श्रीकृष्ण मंदिराच्या जिर्णोद्धाराच्या कामाचेही भूमिपूजन करण्यात आले. परिसरातील स्थानिक नागरिक व भाविकांकडून याबाबत अनेकदा मागणी करण्यात आली होती.

भूमिपूजन कार्यक्रमासाठी यावेळी सामाजिक कार्यकर्ते निलेश नेवाळे, प्रतिष्ठाणचे अध्यक्ष संभाजी खैरे, श्री विठ्ठल- रुक्मिणी मंदिर प्रतिष्ठाण, श्रीमंत छत्रपती शिवाजी पार्कचे सर्व सभासद उपस्थित होते. यावेळी माजी नगरसेवक सुरेश म्हेत्रे, माजी नगरसेविका योगीता नागरगोजे, सामाजिक कार्यकर्ते निलेश बोराटे, नितीन बोऱ्हाडे, मंगेश हिंगणे, निखील बोऱ्हाडे, अतूल बोराटे, निलेश तळेकर आदी उपस्थित होते.

आमदार लांडगे म्हणाले की, भोसरी विधानसभा मतदार संघातील प्रभागनिहाय प्रलंबित विकासकामे निवडणूक आचारसंहितामुळे रखडली होती. “परिवर्तन हेल्पलाईन- 93 79 90 90 90” च्या माध्यमातून नागरी समस्या आणि पावसाळा पूर्व कामे, आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात सोसायटीधारकांच्या समस्या, अशी कामे प्राधान्याने मार्गी लावली जात आहेत.

#### गंधर्व एक्सलन्स् सोसायटीच्या सीमा भिंतीचा प्रश्न मार्गी

भोसरी विधानसभा मतदार संघातील गंधर्व एक्सलन्स् सोसायटी, मोशी येथील सीमाभिंत कामाचे भूमिपूजन करण्यात आले. या सोसायटीमध्ये सुमारे ३ हजार नागरिक वास्तव्यास आहेत. रहिवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सदर सीमा भिंतीचे काम मार्गी लावावे, अशी मागणी होती. त्यानुसार आज कामाला सुरूवात करण्यात आली. तसेच, गंधर्व एक्सलन्स् ते मंत्रा मुव्हमेंट पर्यंतचा रस्ता अपूर्णावस्थेत आहे. तो मार्गी लावावा. या करिता रहिवाशांनी सूचवले होते. सदर रस्त्याचे काम आगामी आठवडाभरात सुरू करु, असे आश्वासन आमदार लांडगे यांनी दिले. त्यामुळे रहिवाशांनी समाधान व्यक्त केले आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते निलेश बोराटे, माजी नगरसेविका अश्विनी जाधव, सारिका बोऱ्हाडे, जालिंदरनाथ जाधव, जयश्री, मोरे, ललीता मजगे, नितू सिंग, सविता काटकर, अश्विनी कुंभार, संतोष माळी, भिकन दुसाने, मनोज वाघ, अंकुश घोंगे, ज्ञानेश्वर साळवे, जगदीश पाटील, निसर्ग पारधी, प्रकाश मोरे, निलेश कोतवाल यांच्यासह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




भूमिका

# आणखी एक डिजिटल ओळखपत्र!

**आयुष्मान भारत या केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी आरोग्यसेवा योजनेअंतर्गत आता रुग्ण आणि लाभार्थींनी उपचार आणि निदानासाठी 'आभा' (आयुष्मान भारत हेल्थ अकाउंट) कार्ड बाळगणे बंधनकारक आहे, असे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने नुकतेच जाहीर केले आहे.**

हे आभा कार्ड देशातील सर्व वैद्यकीय महाविद्यालये आणि संलग्न रुग्णालयांतील बाह्यरुग्ण (ओपीडी), आंतररुग्ण (भरती झालेले), अपघात विभाग आणि आपत्कालीन विभागांमध्ये उपचार घेण्यासाठी येणाऱ्यांनी बाळगणे अपेक्षित आहे. या आदेश किंवा निर्देशाबाबत अजूनही संदिग्धता आहे. म्हणजे आभा कार्ड नसेल, तरी रुग्णाला माघारी पाठवले जाणार नाही हे पाहावे, असेही समजुतीच्या सुरात सांगण्यात आले आहे. यानंतरच्या सल्लासदृश निर्देशात्मक भागाकडे दुर्लक्ष केले तर काय होऊ शकते, याची प्रचीती नुकतीच मध्य प्रदेशातील भोपाळ शहरात आली. त्या शहरात सरकारी रुग्णालयांमध्ये आभा कार्डाची विचारणा रुग्णांकडे झाल्याचे आणि त्याअभावी अडवणूकही करण्यात आल्याचे वृत्त आहे. संबंधित सरकारी यंत्रणांनी अशा प्रकारे अडवणूक केल्याचा इन्कार केला आहे. दोष सर्वस्वी या यंत्रणांना देता येणार नाही. कारण आपल्याकडे गेल्या काही वर्षांमध्ये सारे काही केंद्रिभूत आणि डिजिटलीकृत करण्याकडे कल वाढत आहे. असे केल्यास फायदा



जनतेचाच होणार असे ठासवले जाते. प्रत्यक्षात योजनांचा उद्देश आणि वास्तवातील स्थिती यांत तफावत असल्याचे अनेक ठिकाणी आढळून येते. त्यामुळे आभा कार्ड या नवीन डिजिटल ओळखपत्राची चिकित्सा आवश्यक ठरते. पहिला मुद्दा शुद्ध तंत्रज्ञानाचा. स्मार्टफोन आधारित उपयोजने किंवा ॲप्सच्या माध्यमातून सरकार आणि लाभार्थी असे जाळे निर्माण करण्यावर नरेंद्र मोदी सरकारने गेल्या दहा वर्षांत भर दिला. परंतु ज्यांच्याकडे स्मार्टफोन नसतील अशा मोठ्या वर्गाने करायचे काय, याचे समाधानकारक उत्तर सरकारला आजतागायत देता आलेले नाही. डिजिटलीकरण ही अतिप्रगत आणि छोट्या लोकसंख्येच्या देशांसाठी सर्वोच्च आदर्श व्यवस्था असेलही. परंतु भारतासारख्या अजस्र आणि अर्धविकसित देशामध्ये अजूनही हा प्रकार 'कार्य प्रगतिपथावर असल्या'च्या वर्गवारीतच मोडतो. आभा कार्ड हे आयुष्मान भारत मिशन या व्यापक योजनेचा भाग आहे, असे एकीकडे सांगितले जाते. पण या मिशनअंतर्गत रुग्णांना दाखल करून घेण्यास खासगी रुग्णालये उत्सुक नसतात. उपचारांचे अत्यल्प दर आणि त्यानंतर सरकारकडून देयकांच्या परतफेडीबाबत होणारी टाळाटाळ किंवा विलंब हे कारण दिले जाते. खासगी रुग्णालये ही रुग्णसेवेतून नफा कमावण्यासाठी अस्तित्वात आलेली असतात. आरोग्य, शिक्षण यांसारख्या क्षेत्रात गरीब जनतेचे वाली सरकारच असते. तेव्हा खासगीकरण आणि आधुनिकीकरणाच्या नावाखाली या दोन्ही क्षेत्रांमध्ये सरकारी व्यवस्था सशक्त नसेल, तर सर्वाधिक होरपळ गरीब जनतेचीच होणार. सरकारी रुग्णालयात उपचारांची खात्री नाही आणि खासगी रुग्णालये परवडत नाहीत, असा हा तिढा. त्यात आता सरकारी रुग्णालयांकडे येणाऱ्यांना आभा कार्डाची सक्ती करून काय साधणार? करोनाकाळात आरोग्य सेतू आणि कोविन ही सरकारी केंद्रिभूत उपयोजने आनुषंगिक आणि आपत्कालीन स्वरूपाची होती. आभा कार्ड सार्वकालिक असेल. यात रुग्णांची इत्थंभूत माहिती एका क्लिकवर मिळणार असल्यामुळे उपचारांसाठी वैद्यकीय पूर्वेतिहासाच्या कागदपत्रांचे बाड घेऊन फिरावे लागणार नाही असे एक हास्यास्पद समर्थन केले जाते. प्रत्येक उपचारासाठी अशा प्रकारे पूर्वेतिहासाची गरज भासत नाही. दुसरे म्हणजे, या माहितीचा दुरुपयोग होणार नाही, याची हमी कोण देईल? अमक्या शहरात मधुमेहींचे प्रमाण खूप आहे किंवा तमक्या शहरात हृदयरुग्णांचे प्रमाण अधिक आहे ही माहिती औषधनिर्मिती आणि इतर कंपन्या उत्पादने खपवण्यासाठी वापरणार नाहीत कशावरून?आभा कार्डाची गरज कशासाठी याचे आणखी एक कारण दिले जाते. ते म्हणजे, या माहितीच्या आधारे एखाद्या शहरात वा जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय, सरकारी रुग्णालय सुरू करावे का याचा निर्णय घेता येईल. पण यासाठी जनतेला माहितीच्या कोशात गुरफटून टाकायला कशाला हवे? ते तर जनसंख्या आणि इतर निकषांवरही ठरवता येईल. सबब, आणखी एक डिजिटल ओळखपत्र निर्माण केल्याने जनतेची सोय किती होते आणि गैरसोय किती होते .

## प्रासंगिक »

### सर्वसमावेशक

***नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत सर्वाधिक २४० जागा मिळवूनही बहुमतापासून दूर असल्यामुळे भाजपला आघाडी सरकारचा पर्याय स्वीकारावा लागला.***

१३ वर्षे गुजरातचे मुख्यमंत्री होते आणि त्यानंतर गेली १० वर्षे भारताचे पंतप्रधान आहेत. आता त्यांची पुढील पाच वर्षांसाठी पंतप्रधान म्हणून निवड झाली आहे. एका अर्थाने हा त्यांच्या लोकप्रियतेवर जनतेच्या पसंतीचा शिक्का आहे. दहा वर्षे पंतप्रधान राहूनही, त्यांची लोकप्रियता निरंतर टिकून आहे. लोकांनी या निवडणुकीत पंतप्रधान म्हणून मोदी यांनाच पसंत केले आहे, हे सत्य आहे. अनेकांचा असा गैरसमज झाला आहे की पंतप्रधान मोदींना पहिल्यांदाच संयुक्त सरकार चालवावे लागणार आहे, पण ते खरे नाही. २०१४ आणि २०१९ ही दोन्ही सरकारे एनडीएचीच होती. त्यातही घटक पक्षांचे खासदार मंत्री होते आणि दर अधिवेशनापूर्वी एनडीएची संयुक्त बैठक व्हायची. नरेंद्र मोदी यांचे गुजरातचे १३ वर्षांचे शासन म्हणजे सर्वांना विश्वासात घेऊन एका राज्याला प्रगतीच्या नव्या टप्प्यावर नेऊन ठेवण्याचा कालखंड होता. या काळात पूर, भूकंप आणि अनेक नैसर्गिक संकटे आली.

तुम्ही ९ जून २०२४ रोजी हा लेख वाचत असाल, तेव्हा नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा भारताचे पंतप्रधान होऊ घातलेले असतील. पण ते आपल्याला माहीत असलेले, आधीचे तेच नरेंद्र मोदी नसतील. आता एका एकपक्षीय सरकारचे हुकूमशाही पंतप्रधान आपली भूमिका आवरती घेतील .

# रंगमंचावर आता एक नवा खेळ!

वेगवेगळ्या पक्षांची युती असलेल्या जेमतेम २० जागांचे बहुमत असलेल्या सरकारचे (त्यात १६ खासदार टीडीपीचे असतील तर १२ खासदार जेडीयूचे खासदार) पंतप्रधान या भूमिकेत ते प्रवेश करतील. हा त्यांच्यासाठी पूर्णपणे नवीन अनुभव असेल. आजवरच्या जवळजवळ ५५ वर्षांच्या सार्वजनिक जीवनात पक्षाचे प्रचारक, भाजपचे सरचिटणीस, गुजरातचे मुख्यमंत्री आणि भारताचे पंतप्रधान या वेगवेगळ्या भूमिकांमध्ये वावरलेल्या मोदींनी या भूमिकेसाठी कधीच तयारी केली नव्हती. आता त्यांना पूर्णपणे अपरिचित असलेला असा एक खेळ त्यांना खेळायचा आहे.आपल्याला जे म्हणायचे आहे, ते लोकांनी मतपेटीतून सांगितले आहे. त्यांना स्वातंत्र्य महत्त्वाचे वाटते. भाषण आणि अभिव्यक्तीचा अधिकार, गोपनीयतेचा अधिकार आणि आंदोलन करण्याचा अधिकार त्यांना कायम रहायला हवा आहे. सरकारने 'देशद्रोह' आणि 'बदनामी'साठी बनावट खटले



दाखल करण्याचा आपला अट्टहास बाजूला ठेवला पाहिजे. 'चकमक' आणि 'बुलडोझर न्याय' सोडला पाहिजे (हा विशेषत: उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री आदित्यनाथ यांच्यासाठीचा धडा). राम मंदिर हे राजकारणाच्या पलीकडे आहे आणि राजकीय हेतूंसाठी ते पुन्हा कधीही राजकारणात आणले जाऊ नये, असे लोकांना वाटते (फैजाबाद मतदारसंघातून निवडून आलेले समाजवादी पक्षाचे ७७ वर्षीय अवधेश प्रसाद आणि श्रावस्ती मतदारसंघात पराभूत झालेले पंतप्रधानांचे माजी प्रधान सचिव आणि मंदिर निर्माण न्यासाचे प्रमुख नृपेंद्र मिश्रा यांचे पुत्र साकेत मिश्रा यांना विचारा). लोकांना यापुढच्या काळात ओढून ताणून तयार केलेले एक्झिट पोल नको आहेत; पंतप्रधानांच्या भुवईवरील प्रत्येक वळणाचे वर्णन करणारे (आणि कंटाळवाणे) कव्हरेज नको आहे; उत्तरांबरहुकूम तयार केलेले प्रश्न नको आहेत; आणि ईडी आणि सीबीआयकडून आलेली, त्यांनाही वरून कुणीतरी पाठवलेली माहिती नको आहे; त्यांना खऱ्या अर्थाने मुक्त माध्यमे हवी आहेत. प्रादेशिक पक्षांनी त्यांच्याबद्दलचा विश्वास टिकवून ठेवावा आणि दिल्लीत एक आणि राज्याच्या राजधानीत दुसराच चेहरा असे करू नये, असे लोकांना वाटते. अन्यथा एजीपी, एसएडी, जेजेपी, बीआरएस, आणि जेडी (एस) किंवा बीजेडी आणि वायएसआरसीपीच्या वाट्याला आले तेच या पक्षांच्याही वाट्याला येऊ शकते. टीडीपी आणि जेडीयू यांनीही त्यातून धडा घ्यावा.विरोधी पक्षाला १० वर्षांनंतर संसदीय विरोधी पक्षासारखे वागण्याची संधी मिळाली आहे. त्यांनी संसदेत आणि संसदेच्या बाहेर त्यांच्या मागण्या रेटल्या पाहिजेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)


# मोदींचं पंतप्रधान झाल्याबद्दल अभिनंदन!

## महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोदींना दिल्या शुभेच्छा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पंतप्रधान नरेंद्र मोदींनी एनडीएचे प्रमुख म्हणून तिसऱ्यांदा शपथ घेतली. लोकसभा निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर एनडीएला सत्तास्थापनेसाठी बहुमत मिळाल्याचं स्पष्ट झालं. भारतीय जनता पक्षाला स्वबळावर सत्तास्थापनेसाठीचं गणित जुळवता आलं नसलं, तरी नितीश कुमार व चंद्राबाबू नायडू यांच्या सहकार्याने मोदींनी हे गणित जुळवून आणलं. या पार्श्वभूमीवर नरेंद्र मोदींचा तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी शपथविधी पार पडला असून त्यांच्यासह एनडीएमधील अनेक वरीष्ठ नेत्यांनी मंत्रीपदाची शपथ घेतली.**





त्यानुसार, सर्वात आधी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शपथ घेतली. त्यांच्यानंतर राजनाथ सिंह यांनी शपथ घेतली. तिसऱ्या क्रमांकावर अमित शाह यांनी शपथ घेतली. चौथ्या क्रमांकावर नितीन गडकरी तर पाचव्या क्रमांकावर भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी शपथ घेतली. नड्डांच्या नंतर शिवराज सिंह चौहान यांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोदींना शुभेच्छा दिल्या आहेत.गेली दहा वर्षे व्रतस्थपणे देशाच्या कल्याणासाठी दिवसरात्र झटणारे, जागतिक पातळीवर भारताला मोठा सन्मान मिळवून देणारे आणि अहोरात्र गरिबांच्या कल्याणाचा ध्यास घेतलेले भारताचे भाग्यविधाते, विश्वगुरू नरेंद्र मोदी जी यांनी आज तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. नवा भारत, श्रेष्ठ भारत घडवण्यासाठी त्यांच्या प्रयत्नात आम्ही भक्कम साथ देणार आहोत. भारताची अर्थव्यवस्था तिसऱ्या स्थानी नेण्याचे उराशी बाळगलेले स्वप्न आता पूर्ण होईल, ही खात्री आहे. गरिबांना, वंचितांना विकासाच्या प्रवाहात आणण्याची इच्छा पूर्ण होऊ शकेल. मोदीजींच्या नेतृत्वातील एनडीए सरकार देशाला नव्या उंचीवर नेऊन ठेवेल, असा विश्वास मला वाटतो. अशी पोस्ट मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी केली आहे.शपथविधी सोहळ्यानंतर भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या घरी एनडीएतील सर्व नेत्यांसाठी स्नेहभोजनाच्या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. येथे एनडीएतील घटक पक्षांची महत्त्वाची बैठक पार पडणार आहे. या बैठकीला एंनडीएतील सर्व घटक पक्षांचे नेते तसेच नवनिर्वाचित केंद्रीय मंत्री उपस्थित असतील. जे. पी. नड्डा यांच्या घरी आयोजित केलेल्या स्नेहभोजनाचा मेन्यू देखील खास आहे. यामध्ये सरबत, मिल्कशेक, स्टफ्ड लिची, मटका कुल्फी, आंबे, तीन वेगवेगळ्या प्रकारच्या कोशिंबीरसह इतर व्यंजनांचा समावेश आहे. यामध्ये जोधपुरी भाजी, डाळ, दम बिर्यानी आणि पाच प्रकारच्या पोळ्या (चपात्या/रोट्या) असतील. यासह पंजाबी व्यंजनांचीदेखील व्यवस्था करण्यात आली आहे.

### नड्डांच्या निवासस्थानी स्नेहभोजन

जे. पी. नड्डा यांच्या घरी आयोजित केलेल्या स्नेहभोजनाचा मेन्यू देखील खास आहे. यामध्ये सरबत, मिल्कशेक, स्टफ्ड लिची, मटका कुल्फी, आंबे, तीन वेगवेगळ्या प्रकारच्या कोशिंबीरसह इतर व्यंजनांचा समावेश आहे. यामध्ये जोधपुरी भाजी, डाळ, दम बिर्यानी आणि पाच प्रकारच्या पोळ्या (चपात्या/रोट्या) असतील. यासह पंजाबी व्यंजनांचीदेखील व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच बाजरीची खिचडी आणि इतर अनेक प्रकारचे सरबत उपलब्ध असतील.

तसेच बाजरीची खिचडी आणि इतर अनेक प्रकारचे सरबत उपलब्ध असतील. यासह ज्यांना मिष्ठान्न आवडतं अशा लोकांसाठी आठ वेगवेगळ्या गोड पदार्थांची व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये रसमलाई, चार प्रकारचे घेवर, चहा आणि कॉफी देखील उपलब्ध असेल.सर्वात आधी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शपथ घेतली. त्यांच्यानंतर राजनाथ सिंह यांनी शपथ घेतली. तिसऱ्या क्रमांकावर अमित शाह यांनी शपथ घेतली. चौथ्या क्रमांकावर नितीन गडकरी तर पाचव्या क्रमांकावर भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी शपथ घेतली. नड्डांच्या नंतर शिवराज सिंह चौहान यांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोदींना शुभेच्छा दिल्या आहेत.गेली दहा वर्षे व्रतस्थपणे देशाच्या कल्याणासाठी दिवसरात्र झटणारे, जागतिक पातळीवर भारताला मोठा सन्मान मिळवून देणारे आणि अहोरात्र गरिबांच्या कल्याणाचा ध्यास घेतलेले भारताचे भाग्यविधाते, विश्वगुरू नरेंद्र मोदी जी यांनी आज तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. नवा भारत, श्रेष्ठ भारत घडवण्यासाठी त्यांच्या प्रयत्नात आम्ही भक्कम साथ देणार आहोत. भारताची अर्थव्यवस्था तिसऱ्या स्थानी नेण्याचे उराशी बाळगलेले स्वप्न आता पूर्ण होईल, ही खात्री आहेआणण्याची इच्छा पूर्ण होऊ शकेल. मोदीजींच्या नेतृत्वातील एनडीए सरकार देशाला नव्या उंचीवर नेऊन ठेवेल, असा विश्वास मला वाटतो. अशी पोस्ट मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी केली आहे.शपथविधी सोहळ्यानंतर भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या घरी एनडीएतील सर्व नेत्यांसाठी स्नेहभोजनाच्या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसला यंदा एकही मंत्रीपद नाही?

## अजित पवार गटाकडून सुनील तटकरेंच्या रुपाने एकमेव खासदार

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आता चर्चा आहे ती केंद्रीय मंत्रीमंडळातील मंत्रीपदांची. एकीकडे भारतीय जनता पक्षाला स्वबळावर बहुमत न मिळाल्यामुळे घटकपक्षांच्या समर्थनावर सरकार स्थापन करावं लागत आहे.**

त्यामुळे घटकपक्षांच्या मागण्याही भाजपाला पूर्ण कराव्या लागणार असं चित्र सध्या दिसत आहे. त्याचंच प्रतिबिंब मोदी सरकारच्या तिसऱ्या टर्ममधील शपथविधीमध्ये पडलेलं पाहायला मिळत आहे. नितीश कुमार आणि चंद्राबाबू नायडू यांना मंत्रिमंडळात यथोचित स्थान दिल्यानंतर आता इतर घटकपक्षांमध्ये मंत्रीपदांचं वाटप कसं होईल, याकडे देशाचं लक्ष लागलं आहे.महाराष्ट्रात एकनाथ शिंदे गटाच्या ७ जागा निवडून आल्या असून त्यांना एक मंत्रीपद देण्यात आलं आहे. मात्र, अजित पवार गटाकडून सुनील तटकरेंच्या रुपाने एकमेव



खासदार निवडून आले. या पार्श्वभूमीवर अजित पवार गटाला भाजपाकडून स्वतंत्र पदभाराचं राज्यमंत्रीपद देऊ केलं. मात्र, ही ऑफर अजित पवार गटानं फेटाळून लावल्याची माहिती देवेंद्र फडणवीसांनी माध्यमांशी बोलताना दिली. पण दोन्ही बाजूंनी नेमकी काय चर्चा झाली? यावर आता खुद्द अजित पवारांनीच स्पष्टोक्ती दिली आहे एनडीएच्या इतर घटक पक्षांप्रमाणेच अजित पवार व राष्ट्रवादी काँग्रेसचे इतर घटकपक्ष उपस्थित आहेत. मात्र, शपथविधीच्या काही तास आधी अजित पवार गटाला यंदा एकही मंत्रीपद मिळणार नसल्याचं समोर आलं. त्यासंदर्भात तर्क-वितर्कांना सुरुवात झाली. या पार्श्वभूमीवर दिल्लीत सुनील तटकरेंच्या घरी झालेल्या चर्चेनंतर देवेंद्र फडणवीसांनी माध्यमांशी संवाद साधला. दिवसभर झालेल्या या चर्चेवर संध्याकाळी अजित पवारांनी दिल्लीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत प्रकाश टाकला.

### काय म्हणाले अजित पवार?

काल रात्री आमच्याशी संपर्क साधण्यात आला होता. त्याआधी आम्ही सगळे, राजनाथ सिंह, अमित शाह, जे. पी. नड्डा यांच्यासह आमची सविस्तर चर्चा झाली. निकाल असे का आले? यावर आम्ही बोललो. तेव्हा मी त्यांना विनंती केली होती की सध्या लोकसभेत एक आणि राज्यसभेत एक असे आमचे दोन खासदार आहेत. पण येत्या दोन-तीन महिन्यांत आमचे राज्यसभेत एकूण तीन खासदार होणार आहेत.

# उत्तर प्रदेशात इंडिया आघाडीला मोठं यश!

## आभार मानण्यासाठी 'धन्यवाद यात्रे'चे आयोजन





। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशमध्ये इंडिया आघाडीला मोठं यश मिळालं आहे. या निवडणुकीत इंडिया आघाडीने ८० जागा लढवल्या होत्या. त्यापैकी ४३ जागांवर इंडिया आघाडीला विजय मिळाला. उत्तर प्रदेशातील या विजयाची सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. अशातच आता काँग्रेसकडून उत्तर प्रदेशच्या जनतेचे आभार मानण्यासाठी 'धन्यवाद यात्रे'चं आयोजन करण्यात आलं आहे.**

इंडिया टुडेने दिलेल्या वृत्तानुसार, ११ ते १५ जून दरम्यान काँग्रेसची ही धन्यवाद यात्रा आयोजित करण्यात आली आहे. ही यात्रा ४०३ लोकसभा मतदारसंघातून प्रवास करणार आहे.तसेच काँग्रेसचे वरिष्ठ नेतेसुद्धा या यात्रेत सहभागी होण्याची शक्यता आहे. राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांचा संदेश देण्याचा प्रयत्न या 'धन्यवाद यात्रे'द्वारे केला जाणार आहे. महत्त्वाचे म्हणजे यादरम्यान नागरिकांना संविधानाची प्रत भेट म्हणून दिली जाणार असल्याचीही माहिती आहे. दरम्यान, या निवडणुकीत इंडिया आघाडीने उत्तर प्रदेशात ८० जागांवर निवडणूक लढवली होती. त्यापैकी इंडिया आघाडीला ४३ जागांवर विजय मिळाला. या ४३ जागांपैकी काँग्रेसने ६ तर समाजवादी पक्षाने ३७ जागा जिंकल्या आहेत. तसेच या निवडणुकीत भाजपाला ३३ जागांवर विजय मिळाला आहे. महत्त्वाचे म्हणजे २०१९ च्या तुलनेत यंदा काँग्रेस आणि समाजवादी पक्षाला मोठं यश मिळालं आहे. २०१९ च्या निवडणुकीत उत्तर प्रदेशात काँग्रेस आणि समाजवादी पक्षाचे प्रदर्शन अतिशय खराब राहिले होते. या निवडणुकीत दोघांना मिळून केवळ ६ जागांवर विजय मिळवला आला होता.११ ते १५ जून दरम्यान काँग्रेसची ही धन्यवाद यात्रा आयोजित करण्यात आली आहे. ही यात्रा ४०३ लोकसभा मतदारसंघातून प्रवास करणार आहे. तसेच काँग्रेसचे वरिष्ठ नेतेसुद्धा या यात्रेत सहभागी होण्याची शक्यता आहे.

राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांचा संदेश देण्याचा प्रयत्न या 'धन्यवाद यात्रे'द्वारे केला जाणार आहे. महत्त्वाचे म्हणजे यादरम्यान नागरिकांना संविधानाची प्रत भेट म्हणून दिली जाणार असल्याचीही माहिती आहे.दरम्यान, या निवडणुकीत इंडिया आघाडीने उत्तर प्रदेशात ८० जागांवर निवडणूक लढवली होती. त्यापैकी इंडिया आघाडीला ४३ जागांवर विजय मिळाला. या ४३ जागांपैकी काँग्रेसने ६ तर समाजवादी पक्षाने ३७ जागा जिंकल्या आहेत. तसेच या निवडणुकीत भाजपाला ३३ जागांवर विजय मिळाला आहे. महत्त्वाचे म्हणजे २०१९ च्या तुलनेत यंदा काँग्रेस आणि समाजवादी पक्षाला मोठं यश मिळालं आहे. २०१९ च्या निवडणुकीत उत्तर प्रदेशात काँग्रेस आणि समाजवादी पक्षाचे प्रदर्शन अतिशय खराब राहिले होते. या निवडणुकीत दोघांना मिळून केवळ ६ जागांवर विजय मिळवला आला होता.लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशमध्ये इंडिया आघाडीला मोठं यश मिळालं आहे. या निवडणुकीत इंडिया आघाडीने ८० जागा लढवल्या होत्या. त्यापैकी ४३ जागांवर इंडिया आघाडीला विजय मिळाला. उत्तर प्रदेशातील या विजयाची सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. अशातच आता काँग्रेसकडून उत्तर प्रदेशच्या जनतेचे आभार मानण्यासाठी 'धन्यवाद यात्रे'चं आयोजन करण्यात आलं आहे.

### केजरीवाल सध्या तिहार तुरुंगात

तसेच या निवडणुकीत भाजपाला ३३ जागांवर विजय मिळाला आहे. महत्त्वाचे म्हणजे २०१९ च्या तुलनेत यंदा काँग्रेस आणि समाजवादी पक्षाला मोठं यश मिळालं आहे. २०१९ च्या निवडणुकीत उत्तर प्रदेशात काँग्रेस आणि समाजवादी पक्षाचे प्रदर्शन अतिशय खराब राहिले होते. या निवडणुकीत दोघांना मिळून केवळ ६ जागांवर विजय मिळवला आला होता.११ ते १५ जून दरम्यान काँग्रेसची ही धन्यवाद यात्रा आयोजित करण्यात आली आहे. ही यात्रा ४०३ लोकसभा मतदारसंघातून प्रवास करणार आहे. तसेच काँग्रेसचे वरिष्ठ नेतेसुद्धा या यात्रेत सहभागी होण्याची शक्यता आहे. राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांचा संदेश देण्याचा प्रयत्न या 'धन्यवाद यात्रे'द्वारे केला जाणार आहे. महत्त्वाचे म्हणजे यादरम्यान नागरिकांना संविधानाची प्रत भेट म्हणून दिली जाणार असल्याचीही माहिती आहे.दरम्यान, या निवडणुकीत इंडिया आघाडीने उत्तर प्रदेशात ८० जागांवर निवडणूक लढवली होती. त्यापैकी इंडिया आघाडीला ४३ जागांवर विजय मिळाला. या ४३ जागांपैकी काँग्रेसने ६ तर समाजवादी पक्षाने ३७ जागा जिंकल्या आहेत. तसेच या निवडणुकीत भाजपाला ३३ जागांवर विजय मिळाला आहे.महत्त्वाचे म्हणजे २०१९ च्या तुलनेत यंदा काँग्रेस आणि समाजवादी पक्षाला मोठं यश मिळालं आहे. २०१९ च्या निवडणुकीत उत्तर प्रदेशात काँग्रेस आणि समाजवादी पक्षाचे प्रदर्शन अतिशय खराब राहिले होते. या निवडणुकीत दोघांना मिळून केवळ ६ जागांवर विजय मिळवला आला होता.लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशमध्ये इंडिया आघाडीला मोठं यश मिळालं आहे. या निवडणुकीत इंडिया आघाडीने ८० जागा लढवल्या होत्या. त्यापैकी ४३ जागांवर इंडिया आघाडीला विजय मिळाला.. अशातच आता काँग्रेसकडून उत्तर प्रदेशच्या जनतेचे आभार मानण्यासाठी 'धन्यवाद यात्रे'चं आयोजन करण्यात आलं आहे.

या विजयाची सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. अशातच आता काँग्रेसकडून उत्तर प्रदेशच्या जनतेचे आभार मानण्यासाठी 'धन्यवाद यात्रे'चं आयोजन करण्यात आलं आहे.

# काँग्रेसच्या संसदीय पक्षाच्या अध्यक्षपदी सोनिया गांधी

## काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगेंचा प्रस्ताव एकमताने मंजूर!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेसच्या संसदीय पक्षाच्या अध्यक्षपदी सोनिया गांधी यांची निवड करण्यात आली आहे. शनिवारी ( ८ जून रोजी) सायंकाळी संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये आयोजित काँग्रेसच्या खासदारांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. यासंदर्भातील प्रस्ताव मल्लिकार्जून खरगे यांनी मांडला होता. या प्रस्तावाला काँग्रेसच्या खासदारांनी एकमताने मंजुरी दिली.**

यासंदर्भात बोलताना काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे म्हणाले, "आमच्या नेत्या सोनिया गांधी यांची पुन्हा एकदा काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. ही आमच्यासाठी मोठी गोष्ट आहे. येणाऱ्या काळात आम्ही त्यांच्या मार्गदर्शनात काम करू. त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली, यापेक्षा चांगली गोष्टी कोणतीही असू शकत नाही. अनेक आव्हांनाचा सामना करत त्यांनी काँग्रेस पक्षाची सेवा केली आहे. तसेच स्वत:ला देशसेवेसाठी वाहून घेतलं आहे."याशिवाय काँग्रेस नेते गौरव गोगोई यांनी हा क्षण आमच्यासाठी भावूक असल्याची प्रतिक्रिया दिली. "काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षपदी सोनिया गांधींची पुन्हा एकदा निवड झाली आहे. हा आमच्यासाठी भावनिक



क्षण आहे", असं ते म्हणाले. दरम्यान, काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर सोनिया गांधी यांनी आपल्या भाषणात बोलताना काँग्रेस खासदारांचे आभार मानले. "तुम्ही सर्वांनी माझ्यावर पुन्हा एकदा विश्वास टाकत मोठी जबाबदारी दिली आहे. त्यासाठी मी तुम्हा सर्वांना धन्यवाद देते. अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीत तुम्ही ही निवडणूक लढवली. अनेक अडथळे पार करत अतिशय प्रभावीपणे काँग्रेस पक्षाचा प्रचार केला. त्यामुळे काँग्रेसला हे यश मिळाले आहे", अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.यासंदर्भात बोलताना काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून

### काँग्रेस खासदारांचे आभार मानले.

."याशिवाय काँग्रेस नेते गौरव गोगोई यांनी हा क्षण आमच्यासाठी भावूक असल्याची प्रतिक्रिया दिली. "काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षपदी सोनिया गांधींची पुन्हा एकदा निवड झाली आहे. हा आमच्यासाठी भावनिक क्षण आहे", असं ते म्हणाले.दरम्यान, काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर सोनिया गांधी यांनी आपल्या भाषणात बोलताना काँग्रेस खासदारांचे आभार मानले. "तुम्ही सर्वांनी माझ्यावर पुन्हा एकदा विश्वास टाकत मोठी जबाबदारी दिली आहे. त्यासाठी मी तुम्हा सर्वांना धन्यवाद देते. अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीत तुम्ही ही निवडणूक लढवली.

खरगे म्हणाले, "आमच्या नेत्या सोनिया गांधी यांची पुन्हा एकदा काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. ही आमच्यासाठी मोठी गोष्ट आहे. येणाऱ्या काळात आम्ही त्यांच्या मार्गदर्शनात काम करू. त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली, यापेक्षा चांगली गोष्टी कोणतीही असू शकत नाही. अनेक आव्हांनाचा सामना करत त्यांनी काँग्रेस पक्षाची सेवा केली आहे. तसेच स्वत:ला देशसेवेसाठी वाहून घेतलं आहे

# साथिया' ठरला राणी मुखर्जीच्या आयुष्यातील टर्निंग पॉईंट...

राणी मुखर्जी आणि विवेक ओबेरॉय यांची जोडी तब्बल २१ वर्षांपूर्वी 'साथिया' चित्रपटाच्या निमित्ताने जमली होती. राणीचे सलग काही चित्रपट फ्लॉप ठरल्याने विवेकबरोबरचा 'साथिया' तिच्या आयुष्यातील सर्वात मोठा टर्निंग पॉइंट ठरला. चित्रपट प्रदर्शित झाल्यावर या दोघांच्याही अभिनयाचं सर्वत्र भरभरून कौतुक करण्यात आलं. परंतु, प्रत्यक्षात या चित्रपटाचं शूटिंग करताना विवेकला अनेक अडचणींचा सामना करावा लागला होता. याविषयी त्याने नुकत्याच 'ह्युमन्स ऑफ बॉम्बे'ला दिलेल्या मुलाखतीत खुलासा केला आहे. बॉलीवूडचा प्रसिद्ध दिग्दर्शक राम गोपाल वर्माने विवेकला हा चित्रपट करू नकोस असा सल्ला दिला होता. याविषयी सांगताना अभिनेता म्हणाला, "साथिया चित्रपट करून नकोस असा सल्ला मला प्रत्येकाने दिला. 'तू ॲक्शन हिरो आहेस... प्रेमकथेत काम कसा करणार?' असं सगळेजण बोलत होते. माझे गुरू राम गोपाल वर्मा देखील माझ्यावर संतापले होते. पण, त्यांच्याकडून परवानगी मागण्यापेक्षा, त्यांची क्षमा मागून हा चित्रपट करेन असं मी ठरवलं होतं. मला चित्रपटाची




कथा खूपच आवडली होती. 'साथिया'चा दिग्दर्शक शाद अली माझा शाळकरी मित्र आहे. सुरुवातीला तो अभिषेकबरोबर चित्रपट बनवत होता परंतु, ते काही कारणास्तव शक्य झालं नाही."विवेक पुढे म्हणाला, "शादने मला त्याच्या घरी बोलावलं होतं. त्यावेळी आम्ही मणिरत्नमचा 'आलापयुथे' हा मूळ चित्रपट पाहिला. याच चित्रपटावर 'साथिया' आधारित आहे. तो चित्रपट पाहताना मी शादबरोबर काम करायचं ठरवलं. रेल्वे स्टेशनला शूटिंग करताना मी तिथेच बेंचवर झोपायचो कारण, तेव्हा आमच्याकडे बजेट नव्हतं. मला कोणीही ओळखत नव्हतं. माझ्याकडे मेकअप/व्हॅनिटी व्हॅन नसल्याने मी रेस्टॉरंटच्या स्वच्छतागृहात कपडे बदलायचो. आम्हाला एका दिवसात चार सीन शूट करायचे होते. त्यामुळे दिवसाला १८ ते २० तास मी काम केलं.""चित्रीकरण सुरू असताना आम्ही अनेकदा शूटिंगसाठी स्वतःचं सामान घेऊन जायचो. अशातच माझा पहिला चित्रपट 'कंपनी' प्रदर्शित झाला आणि माझं आयुष्य रातोरात बदलून गेलं.

## नवरा म्हणून माझ्यात काय कमी: अमिर खान

बॉलीवूड अभिनेता आमिर खान मिस्टर परफेक्शनिस्ट म्हणूनही ओळखला जातो. आमिर अभिनयाबरोबर त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही अनेकदा चर्चेत असतो. साल २००५ मध्ये आमिरने किरण रावबरोबर लग्नगाठ बांधली. मात्र, लग्नाच्या काही वर्षातच २०२१ मध्ये दोघांनी घटस्फोट घेतला. आमिर व किरणच्या घटस्फोटाच्या निर्णयाने अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला होता. आता लग्नाच्या तीन वर्षानंतर आमिरने घटस्फोटाबाबत भाष्य केले आहे. नुकतेच आमिर एबीपीच्या आयडिया ऑफ इंडिया समिटमध्ये सहभागी झाला होता. या मुलाखतीत त्याने त्याच्या करिअरबरोबर वैयक्तिक आयुष्याबाबतही अनेक खुलासे केले. दरम्यान, आमिरने या मुलाखतीत त्याच्या व किरणच्या घटस्फोटाबाबतही भाष्य केले.आमिर म्हणाला, "तुम्हा सर्वांना माहीत असेलच की, आमचा नुकताच घटस्फोट झाला आहे. एक दिवस मी संध्याकाळी बसलो होतो, तेव्हा मी किरणला म्हणालो की, नवरा म्हणून माझ्यात काय कमी होती? मी स्वतःमध्ये काय सुधारणा करू शकतो? आता मी आयुष्यात पुढे जात आहे. तर यावर नक्कीच विचार करेन." आमिरच्या या प्रश्नावर किरणने त्याला लिस्टच वाचून दाखवली. "किरण मला म्हणाली की, लिहून घे. तू खूप बोलतोस. तू दुसऱ्या कोणालाच बोलून देत नाहीस.

## रकुल-जॅकीचा जबरदस्त डान्स



अभिनेत्री रकुल प्रीत सिंग व अभिनेता जॅकी भगनानी यांनी २१ फेब्रुवारीला गोव्यात लग्नगाठ बांधली. गेल्या अनेक दिवसांपासून दोघांच्या लग्नाची चांगलीच चर्चा रंगली होती. अखेर दोघांनी लग्न करत नव्या आयुष्याला सुरुवात केली. दोघांच्या लग्नातील फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल झाले होते. यावेळी लग्नातील दोघांच्या लूकची चांगलीच चर्चा रंगली. आता दोघांच्या संगीत कार्यक्रमातील फोटो समोर आले आहेत.रकुलने आपल्या इन्स्टाग्रामवर संगीत कार्यक्रमातील काही फोटो शेअर केले आहेत. एका फोटोत दोघे एकमेकांचा हात पकडून कार्यक्रमस्थळी येताना दिसत आहेत. तर दुसऱ्या फोटोत दोघे डान्स करताना दिसत आहेत. फोटोवरुन रकुल व जॅकीने संगीत कार्यक्रमात धमाकेदार डान्स केला असल्याचे दिसून येत आहे. सोशल मीडियावर हे फोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत. अनेक चाहत्यांनी या फोटोवर कमेंट केल्या आहेत.रकुल प्रीतने तिच्या संगीत कार्यक्रमासाठी प्रसिद्ध फॅशन डिझायनर फाल्गुनी पिकॉकने डिझाईन केलेला लेहेंगा परिधान केला होता. संगीतामध्ये, रकुलने पीच रंगाचा लेहेंगा घातला होता, ज्यावर एम्ब्रॉयडरी केली होती. तर गळ्यात रकुलने हिऱ्यांचा हार घातला होता. तर जॅकीने संगीत कार्यक्रमासाठी वेलवेटपासून बनवलेला गडद निळ्या रंगाचा सूट परिधान केला होता. या लूकमध्ये दोघेही खूपच सुंदर दिसत होते.रकुल व जॅकीने पंजाबी आणि सिंधी रीतीरिवाजानुसार लग्नगाठ बांधली. रकुल पंजाबी आहे. त्यामुळे दोघांचा विवाह पहिल्यांदा 'आनंद कारज' (पंजाबी रीतीरिवाज)नुसार झाला. तर जॅकी हा सिंधी कुटुंबातील असल्यामुळे पंजाबी पद्धतीने लग्न केल्यानंतर त्यांनी सिंधी पद्धतीने पुन्हा एकदा लग्न केले. लग्नानंतर दोघांनी पाहुण्यांसाठी पार्टीही आयोजित केली होती.

## 'भैय्याजी' आहे तरी कोण?

गेली अनेक दशकं बॉलीवूड अभिनेते मनोज बाजपेयी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत. आता लवकरच त्यांचा आणखी एक चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. मनोज बाजपेयींच्या बॉलीवूड कारकीर्दीमधील हा १०० वा सिनेमा असणार आहे. त्यांच्या बहुचर्चित 'भैय्याजी' चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. यामध्ये प्रेक्षकांना जबरदस्त ॲक्शन पाहायला मिळणार आहे.'भैय्याजी'च्या ट्रेलरमध्ये सुरुवातीलाच एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला हा 'भैय्याजी' नेमका आहे तरी कोण? हे सांगत असतो. यानंतर मग ट्रेलरमध्ये मनोज बाजपेयींची एन्ट्री होती. या चित्रपटाचं संपूर्ण कथानक बिहारमधील एका गावाभोवती फिरतं. अपूर्व सिंग कार्की यांनी या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये मनोज बाजपेयी आपल्या कुटुंबाच्या हत्येचा बदला घेण्यासाठी सज्ज झाल्याचं दाखवण्यात आलं आहे.भैय्याजीची ओळख करून देताना एक व्यक्ती ट्रेलरमध्ये सांगते, "भैय्याजी हे मास्टरमाईंड आहेत जे सरकार पाडून त्याच्याजागी विरोधकांना सत्तेवर आणून राजकारण पूर्णपणे फिरवू शकतात. त्यांनी अनेक पापी लोकांना शिक्षा केली आहे." "भैय्याजी रॉबिन हूड आहेत का?" असं विचारताच हा मनुष्य सांगतो, "आमचे भैय्याजी रॉबिन हूडचे पण बाबा आहेत." बाजपेयींसाठी हा सिनेमा अत्यंत खास आहे कारण हा त्यांचा १०० वा सिनेमा आहे. या सिनेमाचं आणखी एक खास वैशिष्ट्य आहे. ते म्हणजे भैय्याजी चित्रपटाची निर्मिती त्यांच्या पत्नी करत आहेत. सुविंदर पाल विकीने या चित्रपटात खलनायकाची भूमिका साकारली आहे.

## शाहरुख खानकडे आहेत तब्बल 'एवढे' फोन



बॉलीवूड किंग शाहरुख खान नेहमी चर्चेत असतो. अभिनयाच्या जोरावर शाहरुखने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. सोशल मीडियावर शाहरुख मोठ्या प्रमाणात सक्रिय असतो. निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करीत तो चाहत्यांना अपडेट देत असतो. जगभरात शाहरुखचे लाखो चाहते आहेत. शाहरुखबद्दल प्रत्येक गोष्ट जाणून घेण्यास चाहते नेहमीच उत्सुक असतात.शाहरुखने टेलिव्हिजनवरून करिअरला सुरुवात केली. मालिकेपासून चित्रपटांपर्यंतचा शाहरुखचा प्रवास म्हणावा तेवढा सोपा नव्हता. शाहरुखच्या कठीण काळात त्याला मदत केली ती निर्माते विवेक वासवानी यांनी. वासवानी यांनी शाहरुखला चित्रपटात केवळ लॉंचच केले नाही, तर संघर्षमय काळात त्याला आपल्या घरी राहण्यास जागाही दिली होती. एकेकाळी विवेक व शाहरुख खास मित्र मानले जायचे. अनेक किस्से सांगितले आहेत.सिद्धार्थ कन्ननला दिलेल्या मुलाखतीत विवेक यांनी शाहरुखबाबत अनेक खुलासे केले आहेत. ते म्हणाले, "शाहरुख आणि मी एकमेकांशी बोलतही नाही आणि भेटतही नाही. पण जेव्हा कधी आम्ही एकमेकांना भेटतो, तेव्हा आम्हाला आम्ही कालच भेटलो होतो.

# भारताचा चित्तथरारक विजय!

## भारताचा नाद करायचा नाय, पाकिस्तानकडून विजय हिसकावला

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारताने ११९ धावा केल्यावर ते सामना जिंकतील, अशी जास्त कोणालाच आशा नव्हती. पण भारताचा नाद करायला नाही, हे पुन्हा एकदा पाहायला मिळाले. कारण भारताने अचूक आणि भेदक गोलंदाजी करत सामन्यात रंगत तर आणलीच, पण हा सामना जिंकत पाकिस्तानला मोठा धक्का दिला. त्यामुळे वर्ल्ड कपमध्ये भारताचा नाद करायचा नाही, हे रोहितसेनेने पुन्हा एकदा दाखवून दिले. भारताने या सामन्यात सहा धावांनी दमदार विजय साकारला.**



भारताचा धावांचा पाठलाग करताना चांगली सुरुवात केली होती. पण बाबर आझम बाद झाला आणि त्यांनी पहिला धक्का बसला. पण त्यानंतर मोहम्मद रिझवानने पाकिस्तानला सावरले. रिझवानने यावेळी ३१ धावा केल्या. पण जसप्रीत बुमराहने रिझवाला क्लीन बोल्ड केले आणि सामन्यात रंगत वाढली. या विकेटनंतर भारत हा सामना जिंकण्याची आशा पल्लवित झाली होती.

भारताने पहिल्या षटकात चांगली सुरुवात केली होती. पण त्यानंतर पावसामुळे खेळ थांबला. त्यानंतर मात्र भारताचा डाव गडगडल्याचे पाहायला मिळाले. विराट कोहली यावेळी बाहेरचा चेंडू मारण्यासाठी सरसावला आणि बाद झाला. त्याला ४ धावाच करता आल्या. रोहित शर्मा यावेळी चांगल्या फॉर्मात दिसत होता. पण मोठा फटका मारण्याच्या नादात त्याने १३ धावांत आपली विकेट गमावली. रोहित बाद झाल्यावर फलंदाजीला आलेल्या अक्षर पटेल आणि ऋषभ पंत यांच्यात चांगली भागीदारी होत होती. पण अक्षर पटेल २० धावांवर बाद झाला आणि ही जोडी फुटली. त्यानंतर ऋषभ पंतवर सर्वांच्या नजरा खिळलेल्या होत्या. भारतीय गोलंदाजांच्या अखेरच्या षटकांतील भेदक गोलंदाजीच्या जोरावर भारताने रोमहर्षक विजय मिळवला आहे. टी-२० विश्वचषक २०२४ मधील भारत-पाकिस्तानच्या हायव्होल्टेज सामन्यात भारताच्या उत्कृष्ट गोलंदाजीचे प्रदर्शन पाहायला मिळाले. न्यूयॉर्कमधील फलंदाजीसाठी अवघड असलेल्या नासाऊ काऊंटी क्रिकेट स्टेडियमच्या खेळपट्टीवर तगडी फलंदाजी फळी असलेला भारतीय संघ ११९ धावांवर ऑल आऊट झाला. बुमराहच्या १५व्या षटकापासून गोलंदाजांनी पाकिस्तानला एकही मोठा फटका खेळण्याची संधी दिली नाही. तर बुमराहने १९व्या षटकात इफ्तिखार अहमदची विकेट घेत पाकिस्तान संघावर मोठा दवाब टाकला. तर अखेरच्या षटकात अर्शदीप सिंगनेही विकेट घेतली. पावसाने व्यत्यय आणूनही भारत पाकिस्तान सामना हा चाहत्यांसाठी पुन्हा एकदा मोठी पर्वणी ठरली. ऋषभ पंतने साकारलेली ४२ धावांची खेळी, तीन भन्नाट झेल आणि जसप्रीत बुमराहने शिस्तबद्ध माऱ्यासह पटकावलेल्या ३ विकेट्स या विजयाचं वैशिष्ट्य ठरल्या. पाकिस्तानविरुद्धच्या या विजयासह भारताचे २ सामन्यात ४ गुण झाले आहेत. सुपर८ साठी ते आगेकूच करत आहेत.

### रोहितची दुखापत फारशी गंभीर नाही

पाकिस्तान संघाला पहिल्या विजयाची आशा होती. परंतु भारताविरुद्ध विजय मिळवणे त्यांच्यासाठी सोपे असणार नाही. .टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेतील भारतीय संघ आपला दुसरा सामना पाकिस्तानविरुद्ध खेळला. या सामन्यापूर्वी कर्णधार रोहित शर्माची दुखापत भारतीय संघाला सतावू लागली होती.. आयर्लंडविरुद्धच्या सामन्यात रोहितला दुखापत झाली होती. जोशुआ लिटलचा वेगवान चेंडू रोहितच्या उजव्या हाताला लागला होता. यानंतर वेदनांनी त्रस्त झालेल्या रोहितने काही वेळानंतर 'रिटायर्ड हर्ट' होण्याचा निर्णय घेतला. आता पुन्हा एकदा रोहित शर्मा दुखापत झाली आहे. रोहित शर्माच्या दुखापतीबाबत बीसीसीआयकडून कोणतीही अपडेट दिलेली नाही. रोहितची दुखापत फारशी गंभीर नवहती.

# रोहितकडून सहाव्यांदा चाहत्यांचा हिरमोड

## पाकिस्तानविरोधात एकदाही मोठी खेळी साकारू शकलेला नाही

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**जगभरातील क्रिकेटरसिकांना ज्या सामन्याची नेहमी प्रतीक्षा असते तो भारत विरुद्ध पाकिस्तान सामना सध्या अमेरिकेत खेळवला जात आहे. आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेतील हे दोन कट्टर प्रतिस्पर्धी आज (९ जून) न्यूयॉर्कच्या नासाऊ काउंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर एकमेकांविरोधात उभे ठाकले आहेत. या हाय व्होल्टेज सामन्यात क्रिकेटरसिक भारतीय खेळाडूंकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा करत होते.**





मात्र या सामन्याच्या सुरुवातीपासूनच भारतीय फलंदाजांची हाराकिरी पाहायला मिळाली. या सामन्यात भारतीय फलंदाज निर्धारित २० षटकंदेखील खेळू शकले नाहीत. भारताचे सर्व फलंदाज १९ षटकात ११९ धावा करून बाद झाले. दरम्यान, भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा पुन्हा एकदा पाकिस्तानविरोधात अपयशी ठरला. रोहित शर्माची सलामीची जोडी या सामन्यात फ्लॉप ठरली. कोहली पहिल्यांदाच पाकिस्तानविरोधात मोठी खेळी साकारण्यात अपयशी ठरला. मात्र रोहितची पाकिस्तानविरोधातील हाराकिरी चालूच आहे. रोहितने आज पुन्हा एकदा भारतीय क्रिकेटरसिकांचं मन मोडलं. रोहितचा फ्लॉप शो न्यूयॉर्कमध्येही कायम राहिला आहे.पाकिस्तान संघाने भारतीय संघाला या सामन्यात ११९ धावांवर सर्वबाद केले आहे. भारतीय संघ संपूर्ण २० षटकेही खेळू शकला नाही. यासह टी-२० क्रिकेटमध्ये पाकिस्तानने पहिल्यांदाच भारतीय संघाला ऑल आऊट केले आहे. भारतीय संघाच्या नावे ही नकोशी कामगिरी झाली आहे. टी-२० विश्वचषकात भारतीय संघ पाकिस्तानविरुद्ध ऑलआऊट होण्याची ही पहिलीच वेळ आहे. त्याचवेळी, टी-२० क्रिकेटमध्ये टीम इंडियाची पाकिस्तानविरुद्धची ही सर्वात कमी धावसंख्या आहे. याआधी टीम इंडियाची पाकिस्तानविरुद्ध टी-२० मध्ये सर्वात कमी धावसंख्या १३३ धावा होती. जी भारतीय संघाने २०१२ साली केली होती. जगभरातील क्रिकेटरसिकांना ज्या सामन्याची नेहमी प्रतीक्षा असते तो भारत विरुद्ध पाकिस्तान सामना सध्या अमेरिकेत खेळवला जात आहे.

### लखनऊ सामने कसे खेळणार

आज (९ जून) न्यूयॉर्कच्या नासाऊ काउंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर एकमेकांविरोधात उभे ठाकले आहेत. या हाय व्होल्टेज सामन्यात क्रिकेटरसिक भारतीय खेळाडूंकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा करत होते. मात्र या सामन्याच्या सुरुवातीपासूनच भारतीय फलंदाजांची हाराकिरी पाहायला मिळाली. या सामन्यात भारतीय फलंदाज निर्धारित २० षटकंदेखील खेळू शकले नाहीत. भारताचे सर्व फलंदाज १९ षटकात ११९ धावा करून बाद झाले. दरम्यान, भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा पुन्हा एकदा पाकिस्तानविरोधात अपयशी ठरला. रोहित शर्माची सलामीची जोडी या सामन्यात फ्लॉप ठरली. कोहली पहिल्यांदाच पाकिस्तानविरोधात मोठी खेळी साकारण्यात अपयशी ठरला. मात्र रोहितची पाकिस्तानविरोधातील हाराकिरी चालूच आहे.